# = विद्या धन. =

रघु, माधव, यशवंत, दिनेश हे चौघे लहानपणापासून मित्र. शाळेत जाऊ लागले तरी त्यांनी मैत्रित अंतर येऊ दिले नाही. चौघेही एकाच शाळेत जात. इतकी त्यांची घनिष्ट मैत्रि होती.

रघु जरा शांत विचारी वर्गात हुशार विद्यार्थी होता. तरी त्याच्याबद्दल त्या तिघांना असूया नव्हती प्रेमच होते. रघु पण त्यांचा अभ्यासातील कमीपणा पाहून त्यांना न हिणवता त्यांना अभ्यासात मदत करत असे परिक्षेच्या वेळेस त्यांच्याकडून अभ्यास करवून घेत असे.

रघुचे वडील सोलापुरलाच शाळा मास्तर होते. रघुवर आई वडीलांचे उत्तम संस्कार होते. खाऊन पिऊन सुखी परिवार होता.

माधवचे वडील सोलापुरलाच सूत गिरणीत कामाला होते. रघु आणि माधव मित्र आहेत तेव्हां आपला मुलगा चांगलाच निपजेल या बद्दल ते आश्वस्त होते. यशवंत आणि दिनेशचेही आई वडील निश्चिंत होते. कारण मास्तरांवर त्यांचा गाढ विश्वास होता. रघु त्यांना आदर्श मुलगा वाटे.

यशवंतचे वडील कपड्याचे व्यापारी होते. सचोटीने व्यापार करत होते. उत्तम व्यापार होता. जरा सुखवस्तु परिवार होता.

दिनेशच्या वडीलांची सोलापूरच्या आसपास बरीच शेती बाग बगीचा होता. घरात रेलचेल होती. तसा सुखवस्तुच परिवार होता.

पाहता पाहता मुले मोठी झाली. चौघेही S.S.C. चांगल्या मार्कांनी पास झाले रघु तर पहिल्यां मधेच आला मास्तरांनी रघुला मोठ्या शहरात शिक्षणासाठी पाठविले या तिघांनी सोलापुरातच राहायला मिळेल असेच पाहिले. नाही म्हटले तरी त्यांना जरा शिंगे फुटलीच होती. माधवने खटपट करुन सूत गिरणीतच नोकरी मिळवली. मग काय पैसा मिळू लागला. आता शिकायचं

M T W T F S S
Page No.: 2
Date:
YOUVA

कशाला म्हणून त्याने शिक्षणाला रामराम ठोकला. यशवंत आणि दिनेशने पण शिक्षणाला रामराम ठोकला. दोघांनी घरच्या उद्योगातच लक्ष घातले. दिनेशला त्याचे वडील शेतकी महाविद्यालयात शिक्षण घे म्हणत होते पण त्याने ऐकले नाही.

रघु मात्र शिकून सवरून खूप मोठा झाला त्याने आई वडीलांना सुखात आनंदात ठेवले होते. खऱ्या अर्थाने पांग फेडले. परदेशात जाऊन उच्च शिक्षणही घेतले.

रघु मित्रांपासून दूर गेला खरा पण तो या मित्रांच्या संपर्कात होता त्यांच्या विवंचना ऐकून त्याला वाईट वाटत असे. पण काय करणार!

संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडल्यावर एकदा रघु मित्रांना भेटायला फुरसतीने आला त्यांच्या गप्पा आणि जीवनानुभव संपत नव्हते. त्यांना वेळ पुरेना झाला. त्यांनी रघुला म्हटले आम्ही चूक केली. तुझ्यासारखे विद्याधन आम्ही पण आधी कमवायला पाहिजे होते पदोपदी आयुष्यात विद्याधन उपयोगी असते हे आम्हाला फार उशीरा कळले. म्हणूनच म्हणतात ना! पश्चात्बुद्धी काय कामाची?

यावर रघु म्हणाला अरे! तुम्हाला काय सांगू बाबांनी मला सांगितलं होतं ते मला मनोमन पटले. त्यांनी मला एक श्लोक सांगितला म्हणाले हे लक्षात ठेव.

स्वगृहे पूज्यते मूर्खः
स्वग्रामे पूज्यते प्रभूः।
स्वदेशे पूज्यते राजा
विद्वान सर्वत्र पूज्यते॥

ते खरेच आहे याची मला प्रचीति आली. मी परदेशात गेलो तरी उच्च विद्याविभूषित असल्याने तिथेही मला तोच मान सन्मान मिळाला. माझ्या शिक्षणाचा तिथेही आदर झाला.

माधव तू जर तुझ्या नोकरीच्या दृष्टीने textile चे शिक्षण घेतले असतेस तर मागे राहिला

Page No.: 3

नसतास. यशवंत तुला वडीलांचा व्यापार उद्योगच करायचा होता तर तू वाणिज्य महाविद्यालयात शिक्षण घेतले असतेस तर उत्तम व्यापार केला असतास व्यापारात खोट आली म्हणून खचला नसतास. दिनेशनेही तेच केले. शेती करणं सोपं नाही खूप कष्ट करावे लागतात तेव्हां शेतात सोनं पिकतं त्यातून शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असतो कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीचे तडाखे असतातच त्यामुळे शेतकऱ्याला नेहमी सजग राहावं लागतं नुसतं आराम बसून शेतीत कांही पिकणार नाही. घाम गाळावा लागतो. तू शेतकीचं शिक्षण घेतलं असतं तर बरोबर आधुनिक तंत्राने शेती करुन पिकवली असतीस.

असो आता झालं गेलं पार पडलं आता आपण पुढच्या पिढ्यांना शिकवू.

जाता जाता महाकवि कालिदासाची गोष्ट सांगतो.

कालिदास अत्यंत गरीब होता. एकदा रागाच्या भरात पत्नीने त्याला म्हटले तू काय करतोस? नुसता भटकतोस? "अस्ति कश्चित वाग् विशेष:" ? म्हणजे भटकून येतोस काम मिळत नाही म्हणतोस. तुझ्याकडे काय आहे? तू कांही शिकलास वाग् म्हणजे वाणीचं कांही शिक्षण घेतलस? चार वाणी परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी यांचा अभ्यास केलास? (पूर्वी शिक्षण मुखोद्गतच असे) कालिदास अपमानाने दुभंगला आणि रागाने घराबाहेर गेला. कांही वर्षांनंतर घरी परत आला पत्नीने परत तोच प्रश्न विचारला. कालिदासाने उत्तर दिले. —

"न चोरहार्यं न च राजहार्यं।
न भ्रातृभाज्यं न च भारकारी।
व्ययकृते वर्धत एव नित्यं॥

चोर चोरू शकत नाही. राजा कर रुपात घेऊ शकत नाही भाऊ वाटणी मागू शकत नाही जे कितीही मिळवलं तरी त्याचा भार होत नाही आणि कितीही खर्च केलं तरी संपत नाही पण आणखी वाढतं असं सर्वात श्रेष्ठ विद्याधन मी मिळवलं.

पुढे कालिदासानी शाकुंतल, मेघदूतासारखी महाकाव्य लिहीली.

असे विद्याधन त्याची महत्ता थोरवी अपार.

—x—x—

आशा पावगी.
आनंदवन B-10
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरुड.

